The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109

A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal

Vol 11.Issue 3; March 2024

# संत साहित्यातील मूल्यविचार - महात्मा बसवेश्वर संदर्भात

**डॉ.शिवसांब दिनानाथ कापसे**

**श्री गुरु बुद्धिस्वामी महावियालय,पूर्णा(जं),जि.परभणी**

भारतीय लोकांच्या जीननाला आकार आणि संस्कार देण्याचे कार्य संतांच्या लिखाणातून झाले आहे. प्राचीन काळापासून अनेक भारतीय संतानी हे महतकार्य केल्याचे दिसते. संत मानवकल्यानाची, विश् बंधुत्वाचे रुजवणूक करून जीवनमूल्यांची पेरणी सातत्याने करीत आले आहेत 'भारताच्या धार्मिक आणि सांस्कृतिक इतिहासात बारावे शतक हे अंत्यत महत्वाचे होऊन गेले. धर्मसुधारणेची आणि नवविचाराची चळवळ या शतकात भारताच्या विविध भागात होऊन गेली. पंजाबात गुरुनानक, उत्तरेत संत कबीर, गुजरात प्रदेशात श्री चांगदेव राऊळ, महाराष्ट्रात स्वामी चक्रधर, कर्नाटकात महात्मा बसवेश्वरांनी आपले कार्य चालू ठेवले होते "[1] सर्व संत महात्मे समाजाच्या कल्यानाचा विचार करताना दिसतात, महात्मा बसवण्णा यांच्या वचनानेही 12 व्या शतकान समग्र सामाजिक, धार्मिक जीवनाला प्रभावित करणारी जीवनमूल्य दिली. सत्य, अहिंया, परोपकार, श्रम, समानता, स्वातंत्र्य, स्त्रीपुरुषसमानता, न्याय, या मूल्यांना महत्त्व देऊन त्याचा अंगिकार प्रत्यक्ष जीवनात करावयास लावून सामाजिक क्रांती करण्याचे काम त्यांनी केले.

'चोऊ नको, माऊ नको, खोटे चोलू नको,
रागावू नको, दुसऱ्याचा मिरकार नको,
आत्मस्तुती नको, तोंडावर कटकारू नको"[2]

खोटे बोलून, रागावून, तिरस्कार करून, आत्मस्तुती करून अंतरंग शुद्धी होणार नाही, म्हणून यातून बाहेर पडण्याचे विचार महात्मा बसवेश्वर मांडतात स्त्रियांच्या बंधमुक्तीचा विचार ते मांडतात, स्त्रीपुरुष समानतेचे मूल्य रुजवण्याचा महात्मा बसवेश्वर प्रयत्न करतात" शूद्रांना आणि स्त्रियांना वेदाध्यनाच अथवा अन्य कोणत्याही धर्मग्रंथांचा अध्ययानाचा अधिकार नव्हता, अशा परिस्थितीत धर्मामध्ये स्त्री पुरुष भेद नाही असे बसवाने स्पष्टपणे उद्घोषित केले"[3]

धर्मामध्ने सर्वांना समान संधी आहे, उच्च निचता नाही, कर्मकांड, नाही, होम हवन नाही, एकेश्वरवादी विचार मानणारा हा धर्म असून मानवतावादी मूल्याला केंद्रस्थानी ठेवणारा आहे.

'अन्यायाची, पिळवणूकीची साधने बनलेली देऊळधार्जिणी प्रवृत्ती, पुरोहितशाही दूर उकलण्यात बसव बसव यशस्वी झाला, उपासना म्हणजे साधक आणि ईश्वर यांच्यातील व्यक्तिगत साहचर्य होय'[4] ईश्वर भक्तीत मध्यस्थाची आवश्यकता नाही, भक्ती सरळ , सोपी, कर्मकांड विरहीत आणि आपल्याला वेळ असेल तेव्हा करता यावी हा विचार बसवेश्वर देताना दिसतात, तसेच व्यक्तीला नीतीमूल्य शिकवताना म्हणतात, 'नीयत होनी चाहिए शरण की, परधन न चाहने की,

नीयत होनी चाहिए शरण की, परसती न चाहने की,
नीयत न रहने वालों को अपनाते नहीं कूडलसंगमदेव'[5]
-बसवण्णा

सद्विचार, सत्य, द्या , विनय, समर्पणभाव, सदाचार, गुरुचे महत्व,नीतिमत्ता अशा सामाजिक मूल्यांना वचनसाहित्यात महत्त्व आहे. 'कायाकवे कैलास' हा महत्त्वाचा मूल्यविचार बसवेश्वर यांनी दिला आहे. श्रमातच स्वर्ग आहे' , श्रमाला महत्व म. वसवेश्वरांनी दिले आहे. उदासीनता, आळस बाजूला करून कार्यतत्परता अंगी आली पाहीजे कार्य, कर्तव्य , कर्म उद्योग व्यवहार, क्रिया यासाठी ते 'कायक' हा शब्द वापरतात,रिकामा वेळ दवडून दारिद्य पदरात पडते ,सतत उद्योगी असणारा जीवन समाधाने व्यतीत करत असतो.

या कायकातूनच 'दासोह करावा असे त्यांना वाटते, दायोह म्हणजे दान, धर्म, उपकार, सहकार, मदत, देणगी या सर्व गोष्टी यात अंतर्भूत आहेत, चा अर्थ मेहनतीच्या पैशातून दासोह केला पाहीजे हा मूल्यविचार वर्तमानकाळातील लोकांनाही लागू होतो.

'सर्व धर्मानी, पंथानी या कायक दासोहा कडे दुर्लक्ष करून आळस, निरर्थक पूजा - अर्चेमध्ये टाळ कुटत, व्यर्थ, घातल्यामुळे देशाचे नुकसान होत गेले. अशा वेळी बसवेश्वरांनी सर्वांना राबायला लावले. 'कायाकवे कैलास' असे त्यांनी सांगितले'[6]. श्रम या मूल्यास म. बसवेश्वर महत्त्व देतात. त्यांनी कठोर शारीरिक ,मानसिक बौध्दिक श्रम करण्याचा मार्ग सांगितला, आपण ज्या क्षेत्रात काम करतो तेथे प्रामाणिकपणा ठेवून श्रम करावेत, हा नीतीविचार त्यांनी सांगितला आहे. अनाथ, अपंग, निराधार, रोगी, कुष्ठरोगी यांच्या मदतीला ते धावून जातात, दु:खितांच्या सेवा करतात, दया हे धर्माचे मूळ आहे. बसवण्णांची कृतिशिलता बोलघेवड्या सुधारकांसाना डोळ्यात अंजन घालणारी आहे 'शरण बंधुनो कुष्ठरोग्याचे शरीर अपंग असेल पण मन अपंग नाही भाव अपंग नाही. रोग शरीराला झाला आहे मनाला नाही'[7] ही मानवी मूल्य आधुनिक काळातही मानसात रुजवावी अशी आहेत.

महात्मा बसवेश्वर यांनी त्या काळी आंतरजातीय विवाह लावून सामाजिक क्रांतीचे कार्य केले आहे. त्यांच्या अनुभव मंटपात अनेक जाती-जमातीचे अनुयायी होते, ज्यांना विचार मांडण्याचे स्वातंत्र होते, म्हणून सामाजिक समता, लोकांचे स्वातंत्र या मूल्याविषयी त्यांनी केलेले हे कार्य अतुलनीय स्वरुपाचे आहे. संत केवळ उपदेश करीत नाहीत, तर त्याचे अनुकरण करण्यासाठी समाजाला तयार करतात, तसेच कृतीकरून समाजबदलाची सुरुवात करण्यासाठी ही जीवनमूल्य आपल्या प्राणापेक्षाही मोलाचे असल्याचे सिद्ध करतात. यज्ञासाठी बळी देण्यासाठी नेत असलेल्या बोकडाला उद्देशून बसवेश्वर एका नचनात मृणतात." मंत्र म्हणत म्हणत पहारे तुला देती बळी , अरे बोकडा तू रड, तुझ्या रडव्याने तरी बळी देणाऱ्यांना करील शासन कुडलसंगमदेव"[8] पशूचे देण्यात येणारे बळी, धर्माच्या नावाने होणाडी हिंसा यास बसवेश्वर वचनातून विरोध करतात, तसेच पशूबळी , पशूहत्या या कुप्रथाला अमान्य करतात, त्यांचा पशूविषयी असलेला ममत्वाचा भावही येथे दिसून येतो.

'कपडे धुणारा धोबी, वस्त्र विणणारा विणकर
वेदपाठ करणारा ब्राह्मण झाला
कर्णातूनी घेती का जन्म कुणी या जगात?'[9]

हिंदू धर्मात ब्रम्ह देवाच्या शरीराच्या विविध भागातून चातुर्वण्यव्यवस्था निर्माण करणारे घटक जन्मले असे सांगितले जाते. त्यालाच याठिकाणी म- बसवेश्वर प्रश्न विचारतात,

कामावरून ही नावे पडली आणि पुढे त्यास जातीत बंदीस्त केल्याचे समाजशास्त्रातून देखील सांगितले जाते. मानवी जीवनातील श्रेष्ठ कनिष्ठता बाजूला सारण्यातून म.बसवेश्वरांची सामाजिक समानतेची शिकवण याठिकाणी पुढे येते.

म. बसवेश्वर यांच्या विचारातून त्यांचा मूल्यविचार साक्षात होतो, मानवता, बंधूभाव, सद्भाव, सामंजस्य, अहिंसा , द्या , सेवाभाव, पावित्र्य, नम्रता, प्रामाणिकपणा, , सामाजिक न्याय, स्त्रियोध्दार, दासोह, कायक, अशा अनेक अंगाने यांचे चिंतन वचन साहित्यातून प्रकट होते त्यांच्या विषयी डॉ. सूर्यकांत घुगरे म्हणतात," बसवेश्वरांची धर्मविषय संकल्पना ही मूलतः मानवी मूल्यांशी (Human values) संबंधीत आहे. या 21 व्या शतकात जगामध्ये सर्वत्र मानवाधिकाराची (Human Rights) भाषा केलली जात आहे. तथापि 900 वर्षापूर्वी 12 व्या शतकात याच मानवी मूल्यांवर धर्मकल्पनेची व्यावहारिक प्रतिष्ठापना केलेली आहे"[10] त्यांचा विचार मूलगामी आहे, वर्तमानकाळातील अनेक समस्यांची त्यांनी केलेली उकल आजही मार्गदर्शक वाटते, महात्मा गांधी यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या विषयी म्हटले, "सुमारे आठशे वर्षापूर्वी कर्नाटकात सत्य, अहिंसा, समता आणि श्रमगौरव या तत्वाचा प्रचार आणि प्रसार केला, त्यांची ही तत्त्वे म्हणजे भारतीय संस्कृतीचे परिपाक आहेत'[11] ,

:

**1 कृष्णा मेगसे श्री बसवेश्वर ते श्री ज्ञानेश्वर एक चिंतन लोक वांग्मयगृह 2009 01**
**2 सौ-शांतीदेवी गुंजाक बसवपथ बसवपथसमिती 2005 58**
**3 एच. तिपेरुद्रस्वामी भारतीय साहित्याचे निर्माते साहित्य अकादमी 2008 27**
**4 एच. तिपेरुद्रस्वामी भारतीय साहित्याचे निर्माते साहित्य अकादमी 2008 29**
**5 .काशीनाथ अंबलगे बसवादि शरणों के साहित्य में सामाजिक चेतना बसवपथ समिती 2005 67**

**6 प्रा. आर. एम. करडीगुद्दी बसवपथ जाने 2011 11**
**7- गौतम निकम संत बसवण्णा विमलकीर्ती प्रकाशन चाळीसगाव 2018 29**
**8 .गौतम निकम संताचे सामानिक व धार्मिक विद्रोह 48**
**9 व्ही. एस. चरंतीमठ बसवण्णांच्या क्चनांमध्ये दलित दर्शन महाराष्ट्र बसव परिषद,भालकी 2009 36**
**10 डॉ सूर्यकांत घुगरे जगत्ज्योती बसवेश्वर महाराष्ट्र बसव परिषद,नांदेड 07**
**10 डॉ सूर्यकांत घुगरे जगत्ज्योती बसवेश्वर महाराष्ट्र बसव परिषद,नांदेड 40**